# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.03.2026** **वारः शनिवार**

---

1. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी एक संघ म्हणून सध्याच्या परिस्थितीला तोंड देण्याचे पंतप्रधानांचे राज्याच्य मुख्यमंत्र्यांना आवाहन
2. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत सुलभतेने आणि जलद पोहोचवण्यासाठी इराणची सहमती
3. पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात, इंधन दर आटोक्यात राहण्यासाठी निर्णय आणि
4. 19 वी इंडियन प्रीमियर लीग - IPL क्रिकेट स्पर्धेला आजपासून बंगळुरूमध्ये सुरुवात

**पंतप्रधान -मुख्यमंत्री**

आखाती प्रदेशातील संघर्ष परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आर्थिक आणि व्यापार स्थैर्य, ऊर्जा सुरक्षा कायम राखत नागरिकांच्या हितांचे रक्षण तसंच उद्योग आणि पुरवठा साखळी बळकट करण्याला केंद्र सरकारची प्राथमिकता असेल यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राज्यांच्या  मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत भर दिला. पंतप्रधानांनी काल दूरस्थ प्रणालीद्वारे, राज्यांच्या तसेच केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्री आणि नायब राज्यपालांची बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. आखाती प्रदेशातील अलिकडील घडामोडींमुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि भारतावर होणारे संभाव्य परिणामाच्या पार्श्वभूमीवर राज्यांच्या तयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

कोविड काळात सामूहिक प्रतिसाद तसंच केंद्र सरकार आणि राज्य सरकार एक संघ म्हणून एकत्रित काम करत जागतिक संकटाला तोंड देण्याचा पूर्वानुभव असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केलं. त्याच पद्धतीनं सध्याच्या परिस्थितीतून मार्ग एक संघ म्हणून एकत्र काम करून आपण या परिस्थितीवर यशस्वीपणे मात करू, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. या वेळी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडून आलेल्या सूचनांचेही स्वागत केले. आगामी काळात सतर्कता, सज्जता आणि समन्वित कृती यांची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केलं.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी म्हणजेच पाईप्ड नॅचरलं गॅस वितरणाला गती देण्यात येत असून खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्यानं आढावा घेतला जात असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. विधानसभा निवडणुका असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठकीला उपस्थिती नसल्याने कॅबिनेट सचिवालय मुख्य सचिवांची स्वतंत्र बैठक घेणार आहे.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील जेवर इथं 'नोएडा आंतरराष्ट्रीयविमानतळा'च्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन करतील. यावेळी पंतप्रधान उपस्थितांना संबोधितही करतील. दिल्लीचे प्रमुख आंतरराष्ट्रीय प्रवेशद्वार म्हणून संकल्पित असलेले हे विमानतळ, देशाची पायाभूत विमानतळ सुविधा बळकट करणे आणि प्रादेशिक तसंच आंतरराष्ट्रीय संपर्क व्यवस्था सुधारण्याच्या दिशेनं टाकलेले मोठे पाऊल ठरणार आहे. नोएडा आणि दिल्ली इथली दोन्ही विमानतळे एकात्मिक विमान वाहतूक प्रणालीप्रमाणे कार्यरत राहातील. तसंच गर्दीचं व्यवस्थापन सुलभ होऊन प्रवासी क्षमता विस्तारेल. सार्वजनिक खासगी भागीदारी आराखड्याअंतर्गत विकसित होणाऱ्या या विमानतळाच्या पहिल्या टप्प्यासाठी एकंदर अकरा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे.

**झारखंड-उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज रांचीच्या भारतीय व्यवस्थापन संस्था म्हणजेच आयआयएमच्या पंधराव्या पदवीदान समारंभाला दूरस्थ पद्धतीने उपस्थित राहातील तसंच व्हर्च्युअल रिॲलिटी केस रिपॉझिटरीचा शुभारंभ करतील. उपराष्ट्रपतींचे आज बिरसा मुंडा विमानतळावर आज आगमन होणार असून, ते आदिवासी स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या वारसांची भेट घेतील तसेच मुंडा यांच्या पुतळ्याला पुष्पांजली वाहतील.

**चौहान-भरणे भेट**

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची काल दिल्लीत भेट झाली. या वेळी झालेल्या चर्चेत, शेतकऱ्यांना पाठिंबा देणे आणि शेतीच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्याविषयीच्या केंद्र सरकारच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरूच्चार केला. किनारी भागालगत अवकाळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची नोंद घेऊन, प्रधानमंत्री धान्य विमा योजनेअंतर्गत, बाधित शेतकऱ्यांना जास्तीत लाभ मिळावा याकडे लक्ष देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसंच, राज्यातील नुकसानाचा आढावा घेण्यासाठी केंद्राचे एक पथक राज्याच्या भेटीवर आल्याची माहिती त्यांनी दिली. विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत 52 गट नियमित निरिक्षणासह शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत झाल्याचंही चौहान यांनी बैठकीत सांगितलं.

**इस्रायल हल्ला**

आखाती प्रदेशातीत संघर्ष अजून वाढला आहे, काल रात्री इस्रायलने इराणच्या महत्त्वाच्या पोलाद, ऊर्जा आणि अणुउर्जा केंद्रांवर अधिक तीव्रतेने हल्ले केले. त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळली आहे. तेहरानकडून या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. या हल्ल्यांमुळे संघर्ष थांबवण्याच्या धोरणात्मक प्रयत्नांना खीळ बसणार असून, वाटाघाटींसाठीच्या वाढीव मुदतीशी विसंगत असल्याचे तेहरानने म्हटलं आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी समाज माध्यमांवरील संदेशातून, इराणच्या या प्रकल्पांसह इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर केलेल्या हल्ल्याची इस्रायलला मोठी किंमत मोजावी लागेल असा इशारा दिला आहे. हे हल्ले अमेरिकेच्या समन्वयाने करण्यात आल्याचा आरोपही अराघची यांनी केला आहे.

**इराण-होर्मूझ**

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत सुलभतेने आणि जलद पोहोचवण्यासाठी सहमती दर्शवली आहे. होर्मूझ ही जागतिक स्तरावरील सर्वाधिक रहदारीचा तेल वाहातूक मार्ग आहे. सद्यस्थितीतील संघर्षात ही सामुद्रधुनी महत्त्वाचा भाग आहे. संयुक्त राष्ट्रांमधील इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी देशाच्या अणुसुविधांवर हल्ले होत असतानाही, मानवतावादी मदत आणि कृषी मालाची वाहतूक या महत्त्वपूर्ण जलमार्गातून होऊ देण्याची संयुक्त राष्ट्रांची विनंती तेहरानने स्वीकारली आहे.

**पेट्रोल-डिझेल मुख्यमंत्री**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इंधनाचे दर आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर 10 रुपये कपात केली आहे. त्यामुळं पेट्रोलवरचं प्रतिलीटर 13 रुपये उत्पादन शुल्क 3 रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर 10 रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकण्यात आलं आहे. यामुळं पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे. राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप 50 टक्क्यावरून 70 टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्राधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**अमित शहा-पश्चिम आशिया**

आखाती प्रदेशातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, देशातील दैनंदिन जीवनावर कोणताही परिणाम झालेला नाही आणि देशाने हे संकट प्रभावीपणे हाताळले आहे, असं गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. दिल्लीत काल एका खासगी माध्यम समूहानं आयोजित केलेल्या शिखर परिषदेत ते बोलत हबोते. गेल्या दशकात, पेट्रोलियम घटकांचे साठे बळकट करणे

आणि राखीव ठेवण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पुरवठ्यातील स्थिरता सुनिश्चित झाली असल्याचं शहा यांनी अधोरेखित केले. अनेक देशांमध्ये इंधनाच्या किंमतींमध्ये वाढ झाली असताना, देशांतर्गत पेट्रोल आणि डिझेल यांच्या किंमतीत फार परिणाम न होता पुरवठाही सुरळीत ठेवला असल्याचे त्यांनी नमूद केलं. इतर देशांना इंधन वापरावर निर्बंधांसारखे उपायांना तोंड द्यावे लागले तुलनेत भारतात मात्र स्थिरता राहिल्याचे त्यांनी नमूद केलं.

**जीसात-जयशंकर**

फ्रान्समध्ये आयोजित जी सात देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत, जागतिक आर्थिक सुरक्षिततेसाठी जलवाहतूक स्वातंत्र्याचे महत्त्व परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी अधोरेखित केलं. त्या विषयी लिहिलेल्या समाज माध्यमांवरील संदेशामध्ये जयशंकर यांनी बैठकीत महत्त्वपूर्ण खनिजांच्या मूल्य साखळीतील सहकार्याचा विस्तार कऱण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची नोंद घेत कौतुक केलं. अमली पदार्थांचा व्यापार आणि दहशतवाद यांच्यातील परस्पर संबंधातून निर्माण होणाऱ्या धोक्यांवर तसंच विविध क्षेत्रांना भेडसावणारे सामाईक धोके आणि सार्वभौमत्व या विषयांवर बैठकीत चर्चा झाल्याचे नमूद केलं.

**अमित शहा एसआयआर**

खोट्या कागदपत्रांच्या आधारे मतदार यादीमध्ये समाविष्ट घुसखोरांची नावे वगळणे हा मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचा मुख्य उद्देश असल्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. दिल्लीतल्या खासगी माध्यमाच्या शिखर परिषदेत ते बोलत होते. तामिळनाडू आणि केरळसह अनेक राज्यात पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यात आली असून, त्याविषयी कोणतेही मोठे आक्षेप घेतले गेले नाहीत. या प्रक्रियेविषयी पश्चिम बंगालमधूनच प्रामुख्याने आक्षेप घेतले गेल्याचे ते यावेळी म्हणाले.

**पश्चिम बंगाल निवडणूक**

पश्चिम बंगालमध्ये विविध भागांत अलीकडे घडलेल्या हिंसाचाराच्या आणि अशांततेच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने पश्चिम बंगाल प्रशासनाची देखरेख अधिक तीव्र केली आहे. पुढील महिन्यात राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने, सर्वच स्तरातील अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातून देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, अजामीन पात्र अटक वॉरंट बजावली जाणे अनिवार्य आहे तसंच फरार आरोपींना पकडण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पश्चिम बंगालमध्ये पुढील महिन्याच्या 23 आणि 29 तारखांना दोन टप्प्यात मतदान होणार आहे.

**आयपीएल**

19 वी इंडियन प्रीमियर लीग अर्थात IPL क्रिकेट स्पर्धा आज संध्याकाळी बंगळुरु इथं सुरु होत आहे. उद्घाटनाचा सामना एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होणार आहे. दोन महिने चालणारी ही स्पर्धा 31 मे पर्यंत सुरू राहील.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.